६३/प.वि.

मंत्रालयात विभागातील आस्थापना विषय कामकाज त्या त्या विभागातील ज्येष्ठतम सचिवांनी हाताळण्याबाबत

2016010711014108०7

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग,
परिपत्रक क्रमांक :शाकानि-१०९९/५४/१८ [र. व का.]
मंत्रालय,मुंबई ४०० ०३२.
दिनांक : ५ नोव्हेंबर,१९९९.

वाचा :- परिपत्रक क्र.सीओएम-१०९३/३५४/प्र.क्र.५२/९६/१८-अ,दि. ८.११.९६

परिपत्रक

मंत्रालयामध्ये ब-याच विभागात एकापेक्षा अधिक प्रधान सचिव/सचिव कार्यरत असल्याने आस्थापना विषयक बाबींच्या संदर्भात उपरोक्त दि. ८.११.९६ चे परिपत्रक अधिक्रमीत करुन पुढील प्रमाणे सूचना देण्यात येत आहेत.

१] ज्या विभागामध्ये एकापेक्षा अधिक प्रधान सचिव, सचिव कार्यरत आहेत अशा विभागातील आस्थापना संबंधीचे कामकाज त्या त्या विभागातील ज्येष्ठतम सचिवांनी हाताळावे.

२] सर्वसाधारणपणे ज्या विषयाचा संबंध अशा विभागातील सर्व सचिवांशी येतो उदा. एका उप विभागातून दुस-या उप विभागात बदल्या, नियुक्त्या करणे, सेवा आणि अर्थसंकल्पिय बाबी हाताळणे इ. बाबतीत ज्येष्ठतम सचिवांनी आपल्या सहयोगी सचिवांच्या बरोबर सल्लामसलत करुन व त्यांना विश्वासात घेऊन निर्णय घ्यावा. याकरिता सहयोगी सचिवांचे मत नस्तीवर घेण्यात यावे व सदर मत विचारात घेऊनच निर्णय घेण्यात यावा.

३] खुद्द सचिवांच्या कार्यालयातील कर्मचा-यांच्या बाबतीत उदा. वाहनचालक, शिपाई इ. शिस्तभंगाची कार्यवाही करण्याची वेळ आली तर त्याची प्रमुख जबाबदारी संबंधित सचिवांची राहील. आस्थापना विभागाने सदर प्रकरणे संबंधित सचिवांच्या सल्ल्यानुसार ज्येष्ठतम सचिवांना सादर करावी.

४] या सचिवांच्या उप विभागाखालील कर्मचा-यांच्या सेवाविषयक बाबी उदा. रजा इत्यादींचे प्रकरण त्या त्या उप विभागातील नियंत्रक अधिका-यांच्या

[कृ.मा.प.]

मार्फत आस्थापना शाखेला पाठविले पाहिजे. रजा इ. बाबतीतला अर्ज परस्पर आस्थापना शाखेला पाठविल्यास तो अर्ज कर्मचा-याला परत करून आपल्या वरिष्ठांमार्फत पाठविण्याबाबत सूचना द्याव्या.

वरील सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(मनीषा क्षत्रि)
अवर सचिव महाराष्ट्र शासन.

प्रति,
राज्यपालांचे सचिव,
अप्पर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सर्व सचिव,
सर्व मंत्रालयीन विभाग.